दैनिक

महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे निर्भिड दैनिक

# वादळ वार्ता

मुख्य संपादक : अजय भांगे

बीड/महाराष्ट्र | मंगळवार दि.१२ नोव्हेंबर २०२४ | आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ | वर्ष २ रे | अंक -८१ | पाने ४ | किंमत ४ रुपये

## आमचे दोन आमदार होते,ते देखील त्यांनी पळवले

**पुणे (वृत्तसंस्था)**-एकेकाळी महायुतीचा घटक पक्ष असलेले राष्ट्रीय समाज पक्षाचे अध्यक्ष महादेव जानकर यांनी मित्रपक्ष भाजपवर सडकून टीका केली आहे. भाजपची मस्ती वाढली आहे. आमचे दोन आमदार होते, ते देखील त्यांनी पळवले, असे सांगताना महादेव जानकर यांना संताप अनावर झाला होता.महादेव जानकर बारामती मतदारसंघातील काटेवाडी कण्हेरी येथे आयोजित सभेत बोलत होते. मी खासदार मंत्री झालो ते आपल्या चिन्हावर झालो मी दुसऱ्यांच्या चिन्हावर झालो नाही. मी घोटाळा अन् चोऱ्या केल्या असत्या तर माझ्याही मागे ईडी लावली असती. मला म्हणले असते तुम्हाला आमच्याबरोबर राहावे लागेल, नाहीतर आत टाकू, अशी टोलेबाजी महादेव जानकर यांनी केली.
पुढे बोलताना महादेव जानकर यांनी भाजपवरही जोरदार निशाणा साधला. भाजपची मस्ती वाढली आहे. त्यांनी काय केले. त्यांनी शिवसेना फोडली, राष्ट्रवादी फोडली. कुठला माणूस कुठ ठेवाला नाही. आमचे एक दोन आमदार होते, ते आमदार पण आमचे पळवले. आमचा आमदार निवडून येतो आमच्या पक्षावर आणि तुम्ही भाजप बरोबर घेऊन जाता, असे म्हणत जानकर यांनी आपल्याच मित्रपक्षाला खडेबोल सुनावले.

# सहकाऱ्यांच्या बेईमानीमुळे अमरावतीत फटका बसला:देवेंद्र फडणवीसांची बच्चू कडूंवर टीका

## नवनीत राणांचा आधुनिक झाशीची राणी असा उल्लेख

**अमरावती (वृत्तसंस्था)**-मेळघाटाने नवनीत राणा यांना ज्याप्रकारे समर्थन दिले, त्यासाठी मी सर्वांना धन्यवाद देतो. आमच्या सहकाऱ्यांनी धोका दिला नसता, तर फक्त मेळघाटाच्या जोरावर १६ हजारांची लीड संपवली असती. आपल्या नवनीत ताई लोकसभेत गेल्या असत्या, असे म्हणत देवेंद्र फडणवीस यांनी नाव न घेता बच्चू कडू यांच्यावर टीका केली. पण आता विधानसभा निवडणुकीत मेळघाट असे मतदान करेल, की संपूर्ण अमरावतीचा रेकॉर्ड मेळघाटमध्ये तुटेल, हा विश्वास आहे, असे देवेंद्र फडणवीस म्हणाले.

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची आज अमरावती येथे जाहीर सभा पार पडली. या सभेत देवेंद्र फडणवीसांनी नवनीत राणा यांचा आधुनिक झाशीची राणी असा उल्लेख केला. नवनीत राणा मेळघाटच्या कन्या आहेत, तर मी पण येथील मुलगा आहे. मेळघाटशी माझे नाते जुने आहे. माझ्या आजोबाचे घर चिखलदऱ्यात आहेत. मी लहानपणी इथे यायचो आणि रहायचो, असे फडणवीसांनी सांगितले. जो राम को लाये हैं, उनको आपको लाना है. हमने हमारा काम किया हैं, अब आप की बारी हैं, असे आवाहनही फडणवीसांनी केले.देवेंद्र फडणवीस म्हणाले की, नवनीत राणा यांनी मेळघाटसाठी ज्या मागण्या केल्या, त्या पूर्ण करु. दुधाला जास्त भाव मिळावा यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. महाविकास आघाडी सरकार आल्यावर येथील कामावर रोख लागली. स्काय वॉकचे काम थांबवण्याचे पाप महाविकास आघाडीच्या सरकारने केले. निवडणुकीआधी आणि नंतरही नवनीत राणांनी मेळघाटशी संपर्क ठेवला. मेळघाट हा त्यांचा परिवार आहे. नेर ते खंडवापर्यंतचा रस्ता पूर्ण करायचा आहे, अशी राणांची मागणी आहे. याचे श्रेय ते मला देतात. पण कारवाई त्यांनी करुन घेतली. स्काय वॉकचेही काम पूर्ण होणार आहे. तुम्ही प्रपोजल करा. पूर्ण करायची जबाबदारी माझी आहे. येणाऱ्या काळात शेतकऱ्यांना २४ तास मोफत वीज मिळेल, अशी घोषणा फडणवीसांनी केली.



### शेतकऱ्यांकडे दुर्लक्ष करणाऱ्यांना सत्ता देऊ नका

# शरद पवारांचे नागरिकांना आवाहन, कृषी मंत्री असतानाचा सांगितला भावनिक किस्सा

**छत्रपती संभाजीनगर (वृत्तसंस्था)**

आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रचार सभा घेणे सुरू झाले आहे. अशात राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे अध्यक्ष शरद पवार हे छत्रपती संभाजीनगर येथील गंगापूर येथे सतीश चव्हाण यांच्या प्रचारासाठी आले होते. यावेळी बोलताना त्यांनी शेतकऱ्यांना दुर्लक्ष करणाऱ्यांकडे सत्ता देऊ नका, असे आवाहन केले आहे. तसेच भाजपवर देखील टीका केली आहे.

शरद पवार म्हणाले, गेल्या ९ महिन्यात ९५० शेतकऱ्यांनी महाराष्ट्रात आत्महत्या केल्या आहेत. शेतकरी आत्महत्या का करत आहेत? शेतकऱ्यांनी घाम गाळला, खर्च केला पण त्याच्या उत्पादनातून खर्च निघत नाही, तो कर्जबाजारी होतो, घरादाराचा लिलाव करतो, समाजात अप्रतिष्ठा होते, त्यामुळे शेतकरी टोकाचे पाऊल उचलतात, असे शरद पवारांनी सांगितले.पुढे बोलताना शरद पवार म्हणाले, मी कृषी मंत्री असताना यवतमाळ येथे शेतकऱ्याची आत्महत्या झाली, अशी माहिती मिळाली. मी अस्वस्थ झालो आणि तत्कालीन पंतप्रधान मनमोहन सिंग यांच्या कानावर गोष्ट घातली. ते आणि मी दिल्लीवरून नागपूरला आलो. तिथून त्याच्या घरी गेलो. तिथं त्या शेतकऱ्याची पत्नी ढसाढसा रडत होती, तिचे अश्रू थांबत नव्हते. कपाशीचे पीक घेतले होते, खते औषध घातली पण पिकावर रोग आला आणि पीक उद्धवस्त झाले. काढलेले कर्ज तसेच राहिले, दुसऱ्या वर्षी तिच स्थिती राहिली, यातून नवरा कर्जबाजारी झाला. सावकारांनी आणि बँकांनी लिलाव काढल्यानंतर ती गोष्ट सहन झाली नाही, त्यामुळे त्या शेतकऱ्याने जीवन संपवले अशी माहिती त्याच्या पत्नीने दिली. नंतर शेतकऱ्यांना बाहेर काढण्यासाठी आम्ही दिल्लीत जाऊन निकाल घेतला. देशातील शेतकऱ्यांच्या डोक्यावरील कर्ज आम्ही माफ करुन टाकले, शेतकऱ्यांना संकटातून बाहेर काढले, आज तशाच निर्णयाची आवश्यकता आहे, असे शरद पवार यांनी सांगितले.शरद पवार म्हणाले, शेतकऱ्यांच्या कुटुंबाचे प्रश्न सोडवण्यासाठी जे काही करावे लागेल ते आम्ही करणार आहोत.

# बावनकुळेंची मविआच्या जाहीरनाम्यावर टीका;मविआचा जाहीरनामा म्हणजे अफवा,ते विकास करणार नाहीत

**नागपूर (वृत्तसंस्था)**

काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी आज महविकास आघाडीचा जाहीरनामा प्रसिद्ध केला. या जाहीरनाम्यात महाविकास आघाडीकडून पाच हमी देण्यात आल्या आहेत. मात्र, मविआचा जाहीरनामा अफवा असल्याची टीका भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी केली आहे. महाविकास आघाडीच्या जाहीरनाम्यावर कोणीही विश्वास ठेवणार नाही, असेही चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले. ते नागपूर येथे माध्यमांशी बोलत होते.
चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, काँग्रेसचा व महाविकास आघाडीचा जाहीरनामा हा अफवा आहे. कारण काँग्रेस विकास करणार नाही, त्यामुळे त्यांच्या जाहीरनाम्यावर कोणी विश्वास ठेवणार नाही. काँग्रेस लाडकी बहीण योजनेसाठी ३ हजार रुपये देणार असल्याचे म्हणत आहे. पण काँग्रेसवाले खोटारडे आहेत. ही योजना बंद करण्यासाठी ते कोर्टात गेलेत. आम्हाला असल्या योजना परवडणार नाहीत, असे विजय वडेट्टीवारांसह अनेक नेते बोलले आहेत आणि आता तेच योजना परत आणत आहेत, असा हल्लाबोल बावनकुळे यांनी केला. तर आमचे बजेट तयार असून रस्ते, वीज, पाण्यासाठी आम्ही केंद्राकडून पैसे आणू, असे ते म्हणाले.बावनकुळे यांनी राहुल गांधी यांनाही टोला लगावला आहे. राहुल गांधी यांचा पायगुण चांगला नाही. तर मोदीजी हे विश्व गौरव पुरुष आहेत. कोणाचा पायगुण चांगला आहे, हे हरियाणा आणि देशाने पाहिले आहे.

# प्रीतमताई मुंडे यांनी केज मतदारसंघ काढला पिंजून

**केज । प्रतिनिधी**

केज विधानसभा निवडणुकीच्या प्रचाराच्या निमित्ताने आज भाजप महायुतीच्या उमेदवार सौ.नमिता अक्षय मुंदडा यांनी कासारी,तरनळी, कोल्हेवाडी, नागझरी, काळूचीवाडी या गावांना भेटी दिल्या. या भेटीदरम्यान गावातील सर्व सामान्य मतदार बंधू-भगिनींशी संवाद साधला.
आपल्या महायुती सरकारचे गतकाळातील कामे व सर्व कल्याणकारी योजना डोळ्यासमोर ठेवून आणि केज परिसरातील विविध कामांचा संदर्भ घेत येत्या २० तारखेला मला आपले मतदानरुपी आशीर्वाद देऊन पुन्हा एकदा जनतेच्या सेवेची संधी द्यावी अशी विनंती केज मतदारसंघातील भाजप महायुतीच्या उमेदवार सौ नमिता अक्षय मुंदडा यांनी यावेळी केली.या प्रसंगी



भाजप महायुतीच्या उमेदवार सौ नमिता अक्षय मुंदडा यांच्या दौऱ्यात तमाम ग्रामस्थ, आजी-माजी सरपंच, ग्रा. सदस्य, सोसायटी चेअरमन, भारतीय जनता पक्ष आणि महायुतीचे सन्माननीय पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. एकंदरीतच सद्याचे केज मतदारसंघातील वातावरण पाहता भाजप महायुतीच्या उमेदवार सौ नमिता अक्षय मुंदडा यांचे निवडणूक चिन्ह कमळ जोमात आहे अशी मतदारसंघातून सगळिकडे चर्चा ऐकायला मिळत आहे. यामुळे भाजप महायुतीच्या उमेदवार सौ नमिता अक्षय मुंदडा यांचा विजय सोपा झाला आहे.

# महायुतीचे सरकारच खरे जनतेचे-राधाकृष्ण विखे पाटील यांचा महाविकास आघाडीवर हल्लाबोल

**राहुरी । । प्रतिनिधी**

राज्यात निवडणुकीचे वातावरण तापले असून, महायुती आणि महाविकास आघाडीमध्ये चुरशीची लढत पाहायला मिळत आहे. याच पार्श्वभूमीवर महायुतीचे नेते आणि पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी महाविकास आघाडीवर जोरदार टीका केली आहे. शिर्डी विधानसभा मतदारसंघातील चंद्रापूर, हसनापूर, आणि दुर्गापूर येथे मतदारांशी संवाद साधताना विखे पाटील म्हणाले की, महाविकास आघाडीचा पंचसूत्री कार्यक्रम फसवा आहे. लोकसभा निवडणुकीच्यावेळी खटाखट पैसे देण्याचे आश्वासन देणाऱ्यांनी अद्याप एक रुपयाही दिला नाही.



विखे पाटील यांनी महायुती सरकारच्या विविध योजनांचा उल्लेख करत जनतेला दिलेला आधार स्पष्ट केला. त्यांनी 'लाडकी बहीण योजना', 'एसटी सवलत', 'नमो शेतकरी सन्मान योजना', 'दुध अनुदान', आणि 'वयोश्री योजना' यांसारख्या योजनांचा उल्लेख केला आणि सांगितले की, महायुती सरकारने सर्वसामान्यांसाठी ठोस मदत दिली आहे.ते म्हणाले, महाविकास आघाडी 'लाडकी बहीण योजना' फसवी असल्याचे म्हणते, तर मग या योजनेसाठी जास्तीची रकमेचे आश्वासन महिलांना कसे देतात? विखे पाटील यांनी महाविकास आघाडीवर ताशेरे ओढत सांगितले की, जनतेच्या मनात महायुतीचे सरकार आहे, आणि भविष्यातही हेच सरकार सामान्य माणसाच्या पाठबळावर सत्तेवर येईल.शिर्डी मतदारसंघात आंतरराष्ट्रीय विमानतळ आणि पाचशे एकरांमध्ये औद्योगिक वसाहतीची योजना असल्याने भविष्यात रोजगाराच्या मोठ्या संधी निर्माण होणार असल्याचेही विखे पाटील यांनी स्पष्ट केले.

# महाविकास आघाडी हाच शेतकऱ्यांसाठी खरा आधार-शरद पवार यांचे प्रतिपादन

**शेवगाव । प्रतिनिधी**

शेतकऱ्यांना सध्याच्या संकटातून बाहेर काढण्यासाठी महाविकास आघाडी हाच एकमेव ठोस पर्याय आहे, असे प्रतिपादन राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी केले. अँड. प्रताप ढाकणे यांच्या प्रचारार्थ शेवगाव येथे आयोजित जाहीर सभेत बोलताना त्यांनी मतदारांना महाविकास आघाडीला पाठिंबा देण्याचे आवाहन केले.

शरद पवार म्हणाले, आज शेतकरी अनेक समस्यांचा सामना करत आहे. या समस्यांवर तोडगा काढण्यासाठी महाविकास आघाडीचे उमेदवार सक्षम आहेत, जे समाजाच्या गरजा ओळखून कार्य करतील. शेवगाव-पाथर्डी मतदारसंघातील अँड. प्रताप ढाकणे यांच्या कामाची प्रशंसा करत पवार यांनी त्यांना प्रामाणिक नेता म्हणून गौरवले.
सभेत खासदार निलेश लंके यांनीही प्रताप ढाकणे यांना जोरदार पाठिंबा दिला. त्यांनी आपल्या भाषणात सांगितले, अँड. प्रताप ढाकणे हा येथे उपस्थित प्रत्येक व्यक्तीचा आवाज आहे. त्यांच्या विजयानंतर आपल्यासारख्या सर्वसामान्य लोकांचा प्रतिनिधी विधिमंडळात पोहोचेल. लंके यांनी मतदारांना मोठ्या संख्येने मतदान करण्याचे आवाहन केले.
सभेदरम्यान ऋषिकेश ढाकणे, प्रभावती ढाकणे, आणि कराळे मास्तर यांनी महाविकास आघाडीत प्रवेश केला, ज्यामुळे आघाडीला बळकटी प्राप्त झाली आहे. यामुळे कार्यकर्त्यांमध्येही उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.शेवगाव व पाथर्डी येथील शेतकऱ्यांच्या समस्यांवर चर्चा करताना शरद पवार यांनी स्थानिक नेतृत्वाच्या महत्त्वावर भर दिला. महाविकास आघाडीच्या माध्यमातून हा मतदारसंघ शेतकरी, कामगार आणि युवकांसाठी योग्य नेतृत्व निवडेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.



संपादकीय

# दुबई देता छप्पर फाड के...

मी ४० वर्षांपूर्वी २६ फेब्रुवारी १९८४ या दिवशी संयुक्त अरब अमिरात (युएई) या आखाती देशातील प्रमुख शहर असलेल्या दुबईच्या भूमीवर पाऊल टाकले. तेव्हा मी वयाच्या विशीत होतो, पण दुबईला जाण्याचा ध्यास मी वयाच्या पंधराव्या वर्षापासून घेतला होता कारण मला दुबईला जाऊन झटपट पैसा मिळवून श्रीमंत व्हायचे होते. माझे ते स्वप्न किती बालिश, उथळ आणि उतावळे होते, हे मला तिथे गेल्यावरच समजले. या स्वप्नामागे दोन कारणे होती. त्या वेळेस माझे वडील नोकरीनिमित्त दुबईला एकटे राहात होते आणि इकडे मुंबईत आई, मी व धाकटा भाऊ कलिना येथे होतो. बाबा वर्षातून दोनदा घरी येत तेव्हा तिकडून वेगवेगळ्या नवलाईच्या गोष्टी घेऊन येत. परदेशी चॉकलेट्स, बिस्किटे, उत्तम खजूर, तलम कापड, टेपरेकॉर्डर व मिक्सर अशी आधुनिक उपकरणे या वस्तूंमुळे वसाहतीत आमचा भाव एकदम वधारून जायचा. असेच चित्र दुबईत रोजगारानिमित्त गेलेल्या इतर मुंबईकरांबाबत बघायला मिळायचे. हे लोक काही वर्षांनंतर घरी यायचे तेव्हा फॅशनेबल पोशाख, गळ्यात सोन्याच्या साखळ्या, इम्पोर्टेड पर्फ्युम अशा समृद्धीच्या खुणा त्यांच्या अंगावर झळकत असायच्या. ते बघून दुबई म्हणजे काहीतरी भारी प्रकरण आहे आणि तेथे गेले की माणूस झटपट श्रीमंत होतो, असा खुळा विचार माझ्या शाळकरी मनात घट्ट रुजला. बाबांसारखे आपणही दुबईला नोकरीला जायचे आणि चिक्कार पैसे कमवायचे, असे चित्र मी रात्रंदिवस मनात बघू लागलो. त्यासाठी सोळाव्या वर्षी घाईघाईने पासपोर्टही काढून घेतला. नियती बहुधा मला मनात हसत असावी कारण 'घी देखा लेकिन बडगा नही देखा,' हे सत्य मला पुढे उमजायचे होते.माझ्या वडिलांची नोकरी संपुष्टात आली तेव्हा भारतात परत येण्यापेक्षा त्यांनी दुबईत एक लहानसे किराणा मालाचे दुकान उघडण्याचे धाडस केले. तोपर्यंत आमच्या घराण्यात कुणी कधीही व्यवसायाच्या वाटेला गेलेले नव्हते. मी बाबांच्या मागे धोशा लावला, की मला तुम्हाला मदत करायला दुबईला येऊ द्या. त्यांना ती कल्पना पसंत नव्हती. मी मुंबईत पदवीपर्यंत शिक्षण घेऊन एखाद्या नोकरीत काही वर्षे अनुभव घ्यावा व नंतर व्हाइट कॉलर जॉबसाठी दुबईत यावे, असे त्यांचे मत होते. पण इकडे माझेच मन शिक्षणात रमत नव्हते. मी शाळकरी वयात बाबांच्या नकळत रस्त्यावर उभे राहून चिंचा-बोरे विकण्याचे उद्योग केले होते. पुढे बाबा दुबईला गेल्यावर महाविद्यालयीन काळात मुंबईच्या उपनगरांत फिनेल, आइस्क्रीम मिक्स अशी उत्पादने दारोदार विकली होती. तेवढ्या अनुभवावर आपण बाबांना मदत करू असा माझा कयास होता. बाबांनी बराच काळ विरोध केला, पण परिस्थितीच अशी आली, की त्यांना निवृत्तीच्या वयात एकट्याने दुकानाचा व्याप झेपेना. त्यामुळे नाईलाजास्तव त्यांनी मला दुबईत येण्याची परवानगी दिली.

दुबईत पोचल्यावर मला तेथील हवामानाशी, खाण्यापिण्याशी आणि भाषेशी जुळवून घेण्यात खूप अडचणी आल्या. मुंबई आणि दुबई ही दोन्ही शहरे अरबी समुद्राकाठी वसलेली असल्याने दोन्हीकडे दमट आणि घामट हवा समान, पण मुंबईला जसा सह्याद्रीचा, अनेक नद्या व तलावांचा शेजार आणि हिरवाईचे वरदान लाभले आहे तसे दुबईचे नाही. शहराची हद्द संपली की थेट वाळवंटच सुरू होते. उन्हाळा आणि हिवाळा अत्यंत कडक आणि पाऊस तुरळक. गरम हवेच्या झळा आणि सतत वाळूची वादळे. मी गेलो तेव्हा दुबई विस्ताराच्या टप्प्यात होते. उंच इमारती आणि इतर पायाभूत सुविधा विकसित होत होत्या. दुबई शहर तेव्हा आंतरराष्ट्रीय व्यापार केंद्र बनलेले नव्हते. त्या काळात बरीचशी दुबई मी पायी हिंडून आणि अब्रा या प्रवासी लाकडी होड्यांमधून स्वस्तात तिकीट काढून पालथी घातली. आमच्या दुकानाला पहिल्याच वर्षी जबरदस्त तोटा झाल्याने तो भरून काढण्यासाठी मी आणि बाबा अथक श्रम करत होतो. आम्ही तीन वर्षे भारतात आलोच नाही. उलट पैसे वाचवण्यासाठी जास्तीत जास्त काटकसर करू लागलो.दुबईतील खाणे आपल्यापेक्षा खूपच वेगळे. फळे आणि मांसाहारावर जास्त भर. खजूर मुबलक, पाणी जपून वापरायचे, आपल्यासारखी चपाती किंवा रोटी घरी बनवणे नसून 'खुबूस' ही बेकरीत तयार मिळणारी ताजी रोटी (साधारण पीटा ब्रेडसारखी) विकत आणून तिच्यासोबत इतर पदार्थ खाण्याची सवय. बाबा आणि मी घरी स्वयंपाक करत असू. आमचे खाणे अगदी सोपे म्हणजे तीन पदार्थांचे. बाजारात मिळणारी कुठलीही भाजी आणून तिचे पातळ कालवण करायचे आणि ते तयार खुबूससोबत खायचे, भातावरही तेच ओतून घ्यायचे. बाकी दुकानात विक्रीसाठी असलेले चटण्या, लोणची, मुरंबे, मसाले वापरण्याची सोय नव्हती कारण माझ्या तत्त्वनिष्ठ बाबांना ते खपायचे नाही. हे असे त्रिकोणी जेवण मी सलग तीन वर्षे खात होतो. नंतर एकदा आई महिनाभरासाठी मुक्कामाला आली तेव्हा तिच्या हातचे घरचे सात्विक जेवण आणि मराठी पदार्थांचा आस्वाद अशी मेजवानी मी उपभोगून घेतली.

दुबईत मला भाषेची मोठी समस्या जाणवली. मला मराठी आणि हिंदी बोलता येई, पण इंग्रजी यथातथाच होते. दुबईत स्थानिक अरबी आणि आंतरराष्ट्रीय इंग्रजी या दोन भाषांची चलती. माझी खूप फजिती व्हायची. मी इंग्रजीला बावरून असल्याचे बघून काही ग्राहक मुद्दाम फर्ड्या इंग्रजीत बोलत. मी आपला 'येस, नो, थँक्यू' म्हणत मान डोलवत उभा राहायचो. अरबी भाषा आजवर कधीच कानावर पडली नसल्याने स्थानिक अरब ग्राहकांसमोर माझी दातखिळी बसायची. पण एकदा एका अरबाने माझी अडचण ओळखून खुणांद्वारे संभाषण केले आणि दिलासा दिला. मग मी अरबी भाषेतील काही शिष्टाचाराचे शब्द शिकून घेतले. इंग्रजीत जसे 'थँक्यू' वारंवार म्हणतात तसे अरबीत 'शुक्रान' (धन्यवाद) म्हणतात. मी अरबी लोकांशी खाणाखुणांच्या भाषेत बोलून शेवटी 'शुक्रान' म्हणायचो. त्याचा त्यांना आनंद वाटायचा. परदेशांत मी सर्वत्र एक गोष्ट बघितली. तुम्ही तोडक्या-मोडक्या का होईना, पण त्यांच्या भाषेत बोललात तरी प्रतिसाद मैत्रीपूर्ण असतो. ते तुमच्या चुकांना हसत नाहीत किंवा हेटाळणीही करत नाहीत. उलट योग्य उच्चार शिकवतात. परदेशात किंवा परमुलखात व्यापार किंवा नोकरीसाठी जाणाऱ्या भारतीयांना माझा सल्ला आहे, की आधी तेथील स्थानिक भाषा प्रयत्नपूर्वक शिकून संभाषण करायला लागा. त्याचे खूप फायदे होतात.

दुबईने मला पहिला धडा दिला तो म्हणजे जीवनात झटपट असे काही नसते. यशासाठी शॉर्ट कट नसतो. तेथे मेहनतच कामी येते. आपल्याकडे जसे मानतात की मुंबई शहर कष्टकऱ्याला उपाशी ठेवत नाही, तसे दुबईबाबत मी म्हणेन, की हे शहर तुमच्या संयमाची, कष्टाची, प्रामाणिकपणाची परीक्षा घेते, पण देण्याची वेळ येताच भरभरून पदरात घालते. मी जे श्रीमंतीचे स्वप्न बघितले होते, ते झटपट नव्हे तर तब्बल २० वर्षांनी साकार झाले. त्या प्रवासात दुबईने दुकानात राबणाऱ्या एका हरकाम्या पोराला अब्जाधीश उद्योजक आणि मसाला किंग बनवून सोडले. अमिरातीचे कायदे सर्वांसाठीच कडक असल्याने येथे भेसळ, गंडवागंडवी, लाच देऊन सुटणे किंवा वशिला असे प्रकार नसतात. त्यामुळे येथे व्यापार-धंदा सचोटीनेच करावा लागतो. पालकांच्या संस्कारांइतकाच हा प्रामाणिकपणा मला दुबईने दिला.अमिरातीचे राज्यकर्ते दूरदृष्टीचे आणि व्यापाराला प्रोत्साहन देणारे असल्याने या देशाची धोरणे उद्योगांसाठी मैत्रीपूर्ण असतात. एका लहानशा किराणामालाच्या दुकानाचे रूपांतर 'अदील ग्रुप ऑफ सुपर स्टोअर्स' या आंतरराष्ट्रीय समूहात होण्यात आणि त्याला आखाती देशांसह विविध खंडांत व्यापाराच्या संधी मिळण्यात दुबईचाच वाटा आहे. आपले पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारत व संयुक्त अरब अमिरात यांच्यातील मैत्री जोपासण्यासाठी दीर्घकाळ मेहनत घेतली आहे, तसे भारत हा ब्रँड जगभर पोहोचवण्यासाठी मोलाची भूमिकाही बजावली आहे. त्याची फळे स्थलांतरित भारतीय समुदाय व आमच्यासारखे अनिवासी भारतीय चाखत आहेत. भारतीयांबद्दल येथील समाजात पूर्वीपासून आदर आहेच, पण आता आम्हाला येथील स्थानिक भावाइतके प्रेमाने वागवतात. दुबईत चार दशके राहिलेला दुबईकर या नात्याने एका हिंदी गाण्याचे शब्द उसने घेऊन आणि थोडे बदलून मी म्हणेन की,

'दुबई शहर जब भी देता, देता छप्पर फाड के.'

# ऐतिहासिक वळणावर चीन



माओ ज दंग यांच्या नेतृत्वाखालील क्रांतीने साकारलेल्या चिनी लोक प्रजासत्ताकाने पाऊणशतकी वाटचालीत अनेक वळणे घेतली, साम्यवादाला काळानुरूप लवचीक केले, बाजारपेठ प्रणालीचा स्वीकार करून देशाला विकासाच्या दिशेने नेले आणि आज जगातील दुसरी मोठी अर्थसत्ता बनविली; परंतु याच कालखंडात तेथील एकाधिकारशाहीही बळकट होत गेली. माओ यांच्यापासून सुरू झालेला साम्यवादी चीनचा प्रवास जिनपिंग पर्वात येऊन पोहोचला, त्यालाही आता एक तप लोटले आहे. आपल्या सर्व विरोधकांचे उच्चाटन करून तहहयात अध्यक्षपदी राहण्याची व्यवस्था करणारे शी जिनपिंग यांच्याकडे आज सर्व सत्तासूत्रे एकवटली असून, चीनला महासत्ता बनविण्याच्या महत्त्वाकांक्षेने ते झपाटले आहेत.गेल्या अडीच दशकांत चीनने औद्योगिक आणि आर्थिक क्षेत्रात दमदार कामगिरी केली, औद्योगिक विकासापासून नव्या महानगरांच्या निर्मितीपर्यंतची आव्हाने पेलली आणि आशिया-आफ्रिका येथील देशांत गुंतवणूक करून आर्थिक-सामरिक हितसंबंधांची पेरणी केली हे खरे; परंतु यातून विस्तारवादी धोरणामुळे भारतासह अनेक देशांशी संघर्षही वाढत गेला. चीन आणि अमेरिका यांच्यातील स्पर्धाही तीव्र होत गेली; इतकी की आता बीजिंगच्या महत्त्वाकांक्षेला लगाम घालण्यासाठी वॉशिंग्टनला भारत, जपान, ऑस्ट्रेलिया यांच्यासह 'क्वाड'ची उभारणी करावी लागली. अमृत महोत्सवी वाटचालीनंतरचा चीन हा असा शक्तिशाली; परंतु सत्तांकाक्षेने झपाटलेला आहे.पाऊण शतकी वाटचाल साजरी करण्यासाठी जिनपिंग यांनी केलेल्या भाषणातूनही चीनचे हेच रूप समोर आले. आता आपल्याला कोणीही रोखू शकत नाही, हे त्यांनी चिनी कम्युनिस्ट पक्षाच्या सुमारे तीन हजार प्रतिनिधींसमोर भाषण करताना उच्चरवाने सांगितले. चीनने केलेल्या प्रगतीचा पाढा वाचतानाच त्यांनी आव्हानांचाही उल्लेख केला. वास्तविक चीनसमोर सध्या आर्थिक आव्हाने आ वासून उभी आहेत; विशेषत: कोव्हिडच्या संकटानंतर तेथील अर्थव्यवस्था सावरलेली नाही. विशेषत: बेरोजगारीचा आणि महागाईचा प्रश्न तीव्रतेने भेडसावत आहे; परंतु जिनपिंग यांनी त्यांचा उल्लेख केला नाही. खरे तर या कारणामुळेच अमृत महोत्सवासारखा महत्त्वाचा टप्पाही चीनमध्ये मोठ्या थाटामाटात साजरा होताना दिसत नाही.

७५ वर्षांच्या पूर्ततेचा उत्साह तेथील लोकांमधून फारसा दिसत नाही; तो फक्त सरकारी माध्यमांतूनच जाणवतो आहे. त्यामुळे जिनपिंग यांनीही आर्थिक आव्हानांना स्पर्श न करता भू-राजकीय आणि सामरिक आव्हानांचाच प्रामुख्याने उल्लेख केला. विशेषत: तैवानबरोबरील एकीकरणाचा मुद्दा त्यांनी जोरकसपणे मांडला. तैवान हा आपलाच घटक असल्याचे चीन मानतो. मात्र, चीनची ही भूमिका तैवानने कधीच मान्य केलेली नाही. चीनशी संघर्ष करीत तैवान आपले स्वतंत्र अस्तित्व टिकवून आहे. त्यासाठी तैवानला अमेरिकेकडून होणारी मदत महत्त्वाची आहे. तैवान ही एक प्रकारे चीनची दुखरी नस बनली आहे. म्हणूनच जिनपिंग यांनी त्याच्या एकीकरणाचा मुद्दा मांडला. चिनी आणि तैवानी नागरिकांचे रक्त एकच असून, रक्ताचे हे नाते इतर नात्यांहून अधिक बळकट असल्याचे हे त्यांचे विधान चीनची आजवरची भूमिका अधोरेखित करणारी आहे.

या शतकाच्या सुरुवातीला दोन अंकी दराने वाढत असलेली चिनी अर्थव्यवस्थेला आता पाच टक्क्याची वाढही अवघड चढण बनली आहे. अर्थव्यवस्थेला गती देण्यासाठीचे प्रयत्न होत असले, तरी अद्याप म्हणावे तसे यश आलेले नाही. विशेषत: तेथील बांधकाम उद्योगात मरगळ आली आहे. अन्य उद्योगांनाही मोठा फटका बसला आहे. देशांतर्गत स्वस्तात उत्पादन करून निर्यात करण्याच्या धोरणाला चीनला मोठे यश आले. मात्र, चीनला आता स्पर्धकही निर्माण झाले असून, निर्यातीवरही विपरीत परिणाम होतो आहे. परिणामी सुशिक्षित बेरोजगारांच्या फौजा फुगत चालल्या आहेत. एकीकडे ही बेरोजगारी, तर दुसरीकडे अनुभवी आणि कुशल मनुष्यबळाची कमतरता असा विरोधाभासही आहे. दीर्घ काळ 'एक मूल' धोरण राबविल्याचा फटकाही बसतो आहे. या धोरणात बदल करण्यात आला असला, तरी वाढत्या महागाईमुळे अधिक मुले जन्माला घालण्याच्या मानसिकतेत तेथील तरुण जोडपी नाहीत. पाऊणशतकी वाटचाल केलेल्या साम्यवादी चीनच्या जागतिक महत्त्वाकांक्षेला धुमारे फुटत असताना तो अशा प्रकारे देशांतर्गत आव्हानांनीही वेढला आहे. त्यांवर मात करून तो पुढील वाटचाल कशी करतो, यावर चीनबरोबर जिनपिंग यांचेही यशापयश अवलंबून असेल.

# खादी-आत्मनिर्भरतेचा धागा



राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची आज जयंती आहे. महात्मा गांधी हे भारतातील खादीचे प्रणेते आहेत. खादी व महात्मा गांधी यांचे अतूट नाते आहे. खादी संबंधात सरदार वल्लभभाई पटेल म्हणाले होते की, 'हिंदुस्थानचे स्वातंत्र्य खादीमध्ये आहे, हिंदुस्थानची सभ्यता व संस्कृती खादीमध्ये आहे, हिंदुस्थानमध्ये ज्यास आपण परमधर्म मानतो, ती अहिंसा खादीमध्ये आहे आणि आपल्यास जे अन्न देतात त्या शेतकरी बांधवांचे कल्याणही खादीमध्ये आहे.'खादी केवळ एक सामान्य वस्त्र नाही, तर एक विचार आहे, स्वदेशीचे प्रतीक आहे, देशाच्या भावविश्वाशी जोडलेला पोषाख आहे. तो पोषाख एक आदर्श चरित्र निर्माण करण्याची प्रेरणा देतो. रामायण, महाभारततही त्याचे उल्लेख आढळतात. खादीचे मूळ नाव 'खद्दर'. त्याचा अपभ्रंश होऊन 'खादी' हे नाव रूढ झाले. कापूस, रेशीम किंवा लोकरीपासून विणलेला कोणताही कपडा म्हणजे 'खादी'. या कापडाला असलेल्या थोड्या खरखरीतपणामुळे त्यास खादी नाव पडले. कापसाची शेती, सूतकताई आणि वीणकाम या तीन गोष्टी ही भारताने जगास दिलेली देणगी आहे. रामायण काळात रेशमी वस्त्र परिधान केले जात असे. महाभारतात सूती वस्त्रांचा उल्लेख आढळतो, जी तमिळनाडू प्रदेशातून खरेदी केली जात. महाराष्ट्रातील अंजिठा लेण्यात पाचव्या शतकात सूत कातताना महिलांचे शिल्पचित्र आहे आणि याचा संदर्भ कौटिल्य अर्थशास्त्रात आढळतो.भारतीय स्वातंत्र्यलढ्यात खादी हे अस्त्र राहिले होते. स्वातंत्र्य आंदोलनात लोकमान्य टिळकांनी जी चतु:सूत्री दिली त्यात 'स्वदेशी' एक सूत्र होते. राष्ट्रपिता महात्मा गांधी यांनी त्याचे महत्त्व ओळखले व खादीला प्रतिष्ठा मिळवून दिली. भारतीय जनतेने विदेशी कपड्यांवर बहिष्कार टाकून पुरुषांनी खादीचे धोतर, पायजमा व महिलांनी खादी साडी परिधान करण्यास प्रारंभ केला होता.सन १९०८मध्ये लंडनमध्ये असताना महात्मा गांधी यांना चरख्याची कल्पना सुचली आणि चरख्याशिवाय स्वराज्यप्राप्ती कठीण आहे, याची त्यांना अनुभूती झाली. १९१७मध्ये गंगाबेन या गुजरातमधील विधवा महिलेशी त्यांचा परिचय झाला. गांधीजींनी तिला चरखा शोधण्याचे आवाहन केले. बीजापूर गावात त्यावेळी बऱ्याच परिवारात चरखे होते, परंतु, तेथील ग्रामस्थांनी ते अडगळीत ठेवले होते. गंगाबेनने गांधीजींना चरखा आणून दिला. साबरमती आश्रमात सूत कातणे सुरू झाले आणि खादीचा पुनर्जन्म झाला. सन १९२०पर्यंत खादीचे काम या आश्रमापुरते सीमित होते. १९२१पासून हळूहळू खादीचा राष्ट्रीय स्तरावर प्रचार होऊ लागला. १९२३मध्ये काकीनाडा काँग्रेस अधिवेशनात खादी बोर्डाची स्थापना झाली. देशभरात काँग्रेस समित्यांच्या वतीने चालणाऱ्या खादीच्या कामाची जबाबदारी या बोर्डाकडे सोपविण्यात आली. पुढे २३ सप्टेंबर १९२५ रोजी गांधीजींच्या सल्ल्यानुसार अखिल भारतीय काँग्रेसच्या बैठकीत अखिल भारतीय चरखा महासंघाची स्थापना झाली आणि खादीच्या प्रगतीला बळ मिळाले. ब्रिटनमधील औद्योगिकरीत्या उत्पादित कापडाऐवजी, म. गांधीजीनी ग्रामीण स्वयंरोजगार व स्वावलंबनासाठी खादीच्या कताईला प्रोत्साहन दिले आणि खादी हा स्वदेशी चळवळीचा एक अविभाज्य भाग व प्रतीक बनला. १९४७मध्ये देशाला स्वातंत्र्य मिळाले. खादीमध्ये अंतर्भूत असलेला स्वदेशी व देशभक्तीचा विचार थोडा मागे पडला. एप्रिल १९५७मध्ये केंद्र शासनाच्या सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग मंत्रालयाअंतर्गत खादी व ग्रामोद्योग आयोगाची स्थापना झाली व पुढे प्रत्येक राज्यात राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळे कार्यरत झाली.गांधीजीनी ग्रामस्वराज्याची कल्पना मांडली होती. खेडे स्वयंपूर्ण होण्यासाठी त्यांनी 'खेड्यांकडे चला' असे आवाहन केले होते. देशाच्या अर्थव्यवस्थेतील कुटीरोद्योगाच्या भूमिकेचे महत्त्व त्यांना पटले व यातूनच खादी व ग्रामोद्योग कल्पना पुढे आली. ग्रामीण कुटुंबरचना आणि अर्थरचना व त्यासाठीच्या शासकीय योजना याचा योग्य मेळ घालत एकमेकांच्या गरजा लक्षात घेऊन परस्परांच्या सहकार्याने गावातच स्वावलंबी नागरिक निर्माण करणे, हे खादी तत्वज्ञानाचे ब्रीद. महात्मा गांधी यांनी सुरू केलेला खादी कार्यक्रम देशाच्या ग्रामीण क्षेत्रातील बेरोजगारांना आज स्वयंरोजगारांच्या संधी व्यापक प्रमाणात उपलब्ध करून देत आहे. यात उल्लेखनीय बाब अशी की यातील ८० टक्के खादी कारागीर महिला आहेत आणि प्रत्येक तिसरा कारागीर मागास वर्गातील आहे.पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणतात की, स्वातंत्र्यापूर्वी 'खादी फॉर नेशन' अशी घोषणा होती. आता ती 'खादी फॉर फॅशन' झाली असून सध्या 'खादी फॉर ट्रान्स्फॉर्मेशन'चा टप्पा चालू आहे. २०१४ नंतर खादीस एक नवे स्वरूप प्राप्त झाले. २०१५पासून खादी आयोगावर पूर्ण वेळ अध्यक्षाची नियुक्ती करण्यात आली. खादीस आता पुन्हा पूर्वप्रतिष्ठा प्राप्त होऊ लागली आहे. नवे डिझाईन, नवी उत्पादने व नवे विपणन धोरण यासकट खादीच्या कामात व्यावसायिक दृष्टिकोन विकसित झाला आहे. खादीचा अर्थ केवळ फॅब्रिकपुरता मर्यादित राहिला नसून ओटस्, फेअरनेस क्रीमसारखी सौंदर्यप्रसाधने, स्नानाचा साबण यासारख्या गृहोपयोगी वस्तू व मध आदिंचा त्यात समावेश आहे. ब्रँड खादी आता बहुराष्ट्रीय कंपनीसारखा एफ. एम. सी.जी ब्रँड झाला आहे. २०१६-१७मध्ये खादी आयोगाची विक्री ५२ हजार कोटी रुपये झाली. २०१९-२०मध्ये ८८,८८७ कोटी रुपयांची उलाढाल झाली. देशभरात खादीची सुमारे ५२ हजार दुकाने आहेत. खादी उत्पादन आणि विक्रीसाठी रेमंड, आदित्य बिर्ला, फॅब इंडिया या बहुराष्ट्रीय कंपन्या त्यात उतरल्या आहेत. रेल्वे प्रवाशांना पुरविण्यात येणारी चादर, उशा व अन्य सामान खादीचे असून, एअर इंडियाने बिझनेस क्लासने प्रवास करणाऱ्यांना खादीचा प्रवास संच देण्यास प्रारंभ केला आहे.

महाराष्ट्राचा विचार केला तर गेल्या वर्षभरात खादीची २४ कोटींची विक्री झाली. स्फूर्ती योजनेअंतर्गत १५ क्लस्टर्स तयार झाली असून नऊ हजार ग्रामीण कारागिरांना रोजगार मिळाला आहे. ग्रामोद्योग योजनेत ४०० कारागिरांनी अगरबत्ती व्यवसायास प्रारंभ केला. हनी मिशनमध्ये एक हजार मधपाळांना १० हजार मधपेट्यांचे वाटप झाले. २००८पासून सुरु झालेल्या पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रमांतर्गत ४० हजार व्यवसाय युनिटस् सुरू झाली आणि त्यात ३.७५ लाख लोकांना रोजगार मिळाला. विद्यमान स्थितीत देशात खादी आयोगाची उलाढाल १.५० लाख कोटीपेक्षा जास्त झाली आहे.गांधीजी म्हणाले होते की, खादी वस्त्र नाही तर विचार आहे आणि हा विचार केवळ जिवंत नसून तो समस्त देशवासीयांच्या आचार व व्यवहाराचा एक भाग आता बनू लागला आहे. खादी हे शाश्वत विकासाचे साधन आहे. खादी (KHADI) या शब्दातच घ (knowledge-ज्ञान), क (Honesty-प्रामाणिकता), - (Alertness- सजगता), ऊ(Discipline- अनुशासन), आणि ख (Integrity- विश्वासार्हता) असा जीवनाकडे बघण्याचा दृष्टिकोन दडलेला आहे. खादी उपयोगात आणणे म्हणजे खादीचा रुमाल, स्नानाचा पंचा, बेडशीट, उशीचे कव्हर, घराचे पडदे, कुर्ता-पायजमा, साडी यापैकी एक व कुटीरोद्योगाच्या माध्यमातून तयार झालेली वस्तू आपल्या घरात कायम वापरणे असा आहे. भारतीयांनी याचे कसोशीने पालन केले तर छोट्या व गरीब कारागिरांच्या घरातील दीप कायम प्रज्वलित राहील व खऱ्या अर्थाने भारत आत्मनिर्भरतेकडे मार्गक्रमण करेल. यासाठी आवश्यकता आहे ती भारतीयांच्या संकल्प - समर्पण आणि सहयोगाची.

# सागरतळातील दुर्मिळ खनिजे

लंडनच्या रॉयल सोसायटीच्या चॅलेंजर या सागरतळ मोहिमेमुळे खोल समुद्रतळ संशोधनास चालना मिळाली. त्यातून गेल्या दशकात मोठी माहिती उजेडात आली आहे. खोल सागरतळाशी असलेले खनीज साठे हे इतर जमिनीत असलेल्या खनीजसाठ्यांच्या सुमारे पाचपट अधिक आहेत. ही खनिजे अधिक समृद्धही आहेत. परंतु ही खनिजे तिथून काढणे अत्यंत कष्टाचे आणि खर्चिक आहे.कोबाल्ट, जस्त, मँगनीज, तांबे, तसेच इतर दुर्मिळ खनिजांचे अफाट भांडार समुद्रतळाशी आहे. सागरतळाशी ही खनिजे तीन प्रकारांमध्ये आढळतात. बटाट्याच्या आकाराचे बहुधातू गोटे किंवा गट्टे (पॉलीमेटालिक नोड्यूल ) हा प्रकार समुद्रतळातील सपाटीवरील भागात आढळतो. या नोड्यूल्समध्ये दुर्मिळ पृथ्वी घटक (रेअर अर्थ एलिमेंट्स), कोबाल्ट, निकेल, तांबे, यट्रीयम, मॉलिब्डेनम, टंगस्टन वगैरे खनिज धातू मोठ्या प्रमाणात समाविष्ट असतात. दुसरा प्रकार, म्हणजे बहुधातू सल्फाइड्स हा सागरतळांमधील हायड्रोथर्मल व्हेंटमच्या परिसरात आढळणारा प्रकार तांबे, शिसे, सोने, चांदीने समृद्ध आहे. तर कोबाल्टसमृद्ध फेरो मँगेनीज क्रस्ट हे तिसऱ्या प्रकारचे खनिज साठे समुद्रतळातील पर्वत परिसरातील खडकांवर आढळतात.सागरात आढळणाऱ्या बहुधातू गोटयांमध्ये येट्रीयम, लँथायम, युरोपियम, होलमियम, स्कॅनडीयम वगैरे १७ प्रकारचे दुर्मिळ खनिज प्रकार आढळतात. त्यांचा वापर उच्चतंत्रज्ञान विषयक उद्योगात मोठ्या प्रमाणात होतो. यांची संयुगे विद्युतउद्योग, एक्स-रे, कॅमेराचे भिंग, हार्ड डिस्क ड्राइव्ह, टीव्ही स्क्रीन, न्यूक्लियर रिऍक्टर्स, एलसीडी, लोहचुंबक, मोबाइल फोन आणि विद्युत वाहनांच्या बॅटरीच्या निर्मितीसाठी मोठ्या प्रमाणात वापरली जातात.आता समुद्रातील अशा अपार संपत्तीचा वेध घेऊन ती मिळविण्यासाठी अनेक देश इच्छुक आहेत. त्यासाठी आंतरराष्ट्रीय सीबेड ऑथारिटीने (आयएसए) भारतासह सात देशांना परवाने दिले आहेत. त्यासाठी भारत सरकारद्वारे हिंदी महासागराच्या तळातील खोलवर दुर्मिळ खनिजे आणि धातूंचा शोध घेण्यासाठी सुमारे ९० मीटर लांबीचे जहाज भारतीय शिपयार्ड द्वारे बांधले जात आहे हे जहाज समुद्रात वैज्ञानिक सर्वेक्षण करील. (पूर्वार्ध)



# घनसावंगी विधानसभा मतदार संघाचे दुसरे प्रशिक्षण संपन्न

**जालना । असलम कुरेशी**
विधानसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ साठी १००-विधानसभा मतदार संघासाठी जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ, अपर जिल्हाधिकारी श्रीमती रिता मैत्रेवार, उप जिल्हा निवडणूक अधिकारी, जालना श्री.शशिकांत हदगल यांच्या मार्गदर्शनाखाली मतदान केंद्राध्यक्ष, सहाय्यक मतदान केंद्राध्यक्ष आणि इतर मतदान अधिकारी यांचे दुसरे प्रशिक्षण दिनांक ११ नोव्हेंबर २०२४ रोजी तालूका क्रिडा अधिकारी कार्यालय, राजेगाव रोड, घनसावंगी येथे संपन्न झाले.
या प्रशिक्षण वर्गास मतदान केंद्राध्यक्ष, सहाय्यक मतदान केंद्राध्यक्ष आणि इतर मतदान अधिकारी निहाय कर्तव्य व जबाबदारींचे सूक्ष्म मार्गदर्शन पीपीटीद्वारे सादरीकरण करण्यात आले. त्यामध्ये लोकप्रतिनिधीत्व अधिनियम १९५१ च्या कलमान्वये मतदान केंद्राध्यक्ष, सहाय्यक मतदान केंद्राध्यक्ष आणि इतर मतदान अधिकारी यांची नेमणूक करण्यात आली असून निवडणूक आयोगाच्या प्रतिनियुक्तीवर असल्याबाबतची जाण करून देण्यात आली. मतदान प्रक्रियेतील असलेल्या महत्वाच्या टप्प्याबाबत माहिती, साहित्य वाटप, मतदान पूर्व, मतदानादरम्यान, मतदान संपल्यानंतरच्या संपुर्ण जबाबदाऱ्या पार पाडणे, निवडणूक साहित्य स्विकृती व तपासणी करणे, ई.व्ही.एम. तपासणी, व्ही.व्ही.पॅट संबंधी माहिती, चिन्हांकित फोटो मतदार यादी, मतदानाच्या आदल्या दिवशी करावयाची तयारी, मतदान केंद्रावर करावयाच्या बाबी, निवडणूक कायद्याची अंमलबजावणी, मॉकपोल बाबतचा फ्लो चार्ट, मतदानासंबंधीची गुप्तता, मतदाराची ओळख पटविण्यासाठी आवश्यक कागदपत्रे, महत्वाचे अहवाल/नमूने तयार करणे तसेच या निवडणूकीमध्ये



काही नवीन बाबींचा समावेश करण्यात आलेला आहे. जे मतदार प्रत्यक्ष मतदान केंद्रावर येवून मतदान करून शकत नाहीत त्यामध्ये ८० वर्षावरील ज्येष्ठ मतदार, दिव्यांग मतदार, कोविड-१९ संबंधित मतदार, अत्यावश्यक सेवा पुरविणारे मतदार यांच्यासाठी टपाली मतपत्रिकेद्वारे त्यांचे मतदान करून घेण्याबाबत सविस्तर माहिती निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी अंबड श्रीमती मनिषा दांडगे यांनी दिली. सदरील प्रशिक्षणास एकूण २०० मतदान केंद्राध्यक्षापैकी १९५ केंद्राध्य हजर होते. एकूण २०० सहाय्यक मतदान केंद्राध्यक्ष पैकी १९१ हजर होते आणि एकूण २६३ इतर मतदान अधिकारी पैकी २४१ हजर होते.
सदरील प्रशिक्षणानंतर उपस्थित मतदान केंद्राध्यक्ष, सहाय्यक मतदान केंद्राध्यक्ष आणि इतर मतदान अधिकारी यांना ईव्हीएम हाताळणी करण्याबाबतचे प्रशिक्षण देण्यात आले. हे प्रशिक्षण यशस्वी करण्यासाठी सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसीलदार घनसावंगी श्रीमती योगिता खटावकर, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी श्री. विजय चव्हाण, श्री. संतोष इथापे, श्री. सोमनाथ तोतला, नायब तहसीलदार श्रीमती मोनाली सोनवणे, गटशिक्षणाधिकारी श्री. रवि जोशी, श्री. गोविंद नाईक, श्री. अशोक बडवणे, यांनी परिश्रम घेतले.

## शेतकऱ्यांवर अन्याय करणाऱ्या सरकारला सत्तेवर राहण्याचा अधिकार नाही-शरद पवार

**सेलू । प्रतिनिधी**
सेलू शहरात विजय भांबळे यांच्या प्राचारसाठी शरद पवार यांची जाहीर सभेचे आयोजन आज दिनांक ८ नोव्हेंबर शुक्रवार रोजी सेलू शहरातील नूतन विद्यालय प्रांगणात आयोजित करण्यात आले होते यावेळी उपस्तीत जनसमुदायाला मार्गदर्शन करतांना राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे अध्यक्ष खा शरद पवार यांनी सांगीतले की राज्यातील गोर गरीब शेतकऱ्यावर अन्याय करणाऱ्या सरकारला सत्तेवर राहण्याचा अधिकार नाही असे सांगीतले वेळी व्यासपीठावर जिंतूर सेलू विधानसभेचे उमेदवार माजी आ विजय भांबळे, खा डॉ फौजिया खान मॅडम,खा संजय जाधव, शिवसेनेचे जिल्हा प्रमुख सरपंच संजय साळेगावकर, साईबाबा बँकेचे अध्यक्ष तथा काँग्रेस पक्षाचे सेलू तालुका अध्यक्ष हेमंतराव आडळकर,परभणी जिल्हा परिषदेचे माजी अर्थ व बांधकाम सभापती अशोक नाना काकडे,माजी आ विजय गव्हाणे,झाकेर लाला, सुधाकर रोकडे, माजी नगरअध्यक्ष पवन आडळकर, सुधाकर पवार, छगन शेरे, अशोक उफाडे,नथुराम अंभोरे, सह



आदींची उपस्थिती होती आपल्या भाषणात उमेदवार विजय भांबळे यांनी सांगीतले की माझा विजय हा सेलू जिंतूर विधानसभेतील सर्व सामान्य जनतेचा विजय असुन तुम्ही मला दहा दिवस द्या मी तुम्हाला पूर्ण आयुष्य देईल असे सांगीतले यावेळी सेलू तालुक्यातील माहाविकास आघाडीतील सर्व पद अधिकारी कार्यकर्ते महीला मोठया संख्येने उपस्थित होते.

### मंत्री विखे पाटील यांचा आ.बाळासाहेब थोरात यांच्यावर हल्लाबोल

## शिर्डी मतदारसंघात विकासाची नवी दिशा विरोधकांच्या निष्क्रीयतेवर जोरदार टीका

**संगमनेर । प्रतिनिधी**
काही वर्षं मंत्रिपद भूषवूनही तालुक्यात आवश्यक बदल घडवू न शकणारे माजी मंत्री बाळासाहेब थोरात, आता मतदारांची दिशाभूल करून त्यांच्यात भीती निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहेत. मात्र, आमचा सुज्ञ मतदार त्यांच्या खोट्या आरोपांना बळी पडणार नाही, अशी कठोर टीका महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी केली. महायुतीच्या प्रचारार्थ तालुक्यातील हजारवाडी, पानोडी, पिंपरी लोकी आणि अजमपुर या गावांमधील बैठकीत मंत्री विखे पाटील यांनी मतदारांशी संवाद साधला. या बैठकीत मतदारांनी मंत्री विखे पाटील यांचे जोरदार स्वागत केले, तर लाडक्या बहिणीही या स्वागतासाठी मोठ्या संख्येने हजर होत्या.
विखे पाटील म्हणाले की, निळवंडेचे पाणी आल्याने या भागाचा विकास साध्य झाला



आहे. महायुती सरकारने विविध योजनांच्या माध्यमातून जनतेला आधार दिला आहे. काँग्रेसच्या कार्यकाळात विकासाच्या फक्त गप्पा झाल्या, पण प्रत्यक्षात काहीच केले नाही. शिर्डी विधानसभा मतदारसंघात या भागातील गावांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी आम्ही विशेष प्रयत्न केले आहेत.
निळवंडे कालव्याचा प्रकल्प काँग्रेसच्या कार्यकाळात रखडला होता. मात्र, महायुती सरकारच्या पुढाकाराने कालव्यांची कामे मार्गी लागली. कालव्यांचे पाणी आणण्याचे श्रेय हे फक्त महायुती सरकारचेच आहे, असे ठामपणे सांगत विखे पाटील यांनी काँग्रेसच्या निष्क्रियतेवर जोरदार प्रहार केला.जिल्ह्यातील तीन तालुक्यांना औद्योगिक वसाहतींसाठी जागा उपलब्ध करून दिल्याचे विखे पाटील यांनी सांगितले. महसूल मंत्रीपद असतानाही थोरातांना हे साध्य करता आले नाही, असे सांगत त्यांनी रोजगार निर्मितीतील काँग्रेसच्या अपयशावर लक्ष वेधले.विखे पाटील यांनी आ. थोरात यांना निष्क्रियतेवरून टोला लगावत म्हटले की, डॉ. सुजय विखे पाटील यांच्या सभेला मिळालेल्या प्रतिसादामुळे थोरात हादरले आहेत. तालुक्यातील युवकांसह ज्येष्ठ नागरिक व महिलाही काँग्रेसच्या ४० वर्षांच्या कामगिरीवर तीव्र प्रतिक्रिया व्यक्त करत आहेत.

## एमआयएमचे माजी नगरसेवक शेख शरीफ यांचा धनंजय मुंडेंच्या नेतृत्वात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश

### शरीफ भाईंची घरवापसी,जोमाने काम करणार



**परळी वैजनाथ । प्रतिनिधी**
परळीतील एम आय एम चे नेते व माजी नगरसेवक शेख शरीफ यांनी एम आय एम ला सोडचिठ्ठी देत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते तथा परळी विधानसभेचे उमेदवार धनंजय मुंडे यांच्या नेतृत्वात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला आहे. यावेळी धनंजय मुंडे यांनी शरीफ भाईंचे स्वागत करत पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. शरीफ भाई हे पूर्वाश्रीचे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचेच कार्यकर्ते होते त्यामुळे परत एकदा घर वापसी केल्यामुळे आपण आनंदी असून आता धनंजय मुंडे यांचे निष्ठेने व अधिक जोमाने काम करणारा असून या निवडणुकीत मी व माझ्या सर्व सहकारी तनमंदनाने धनंजय मुंडे यांच्या पाठीशी राहतील असा शब्द यावेळी शरीफ भाईंनी दिला. यावेळी शेख शरीफ, वाजेद खान, मुसा भाई, निसार पठाण, पापा ठाकूर, जमील अध्यक्ष, हाजी बाबा, शेख जमिल, युनूस खान, लायक खान यांसह आदी उपस्थित होते.

## वंचित आघाडीचे शफिक अत्तार यांचा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीत प्रवेश



**जालना । असलम कुरेशी**
घनसावंगी तालुक्यातील रांजणी येथील वंचित बहुजन आघाडीचे कार्यकर्ते शफिक अत्तार यांनी माजी आरोग्य मंत्री राजेशभैय्या टोपे यांचे विकास कार्य व नेतृत्वावर विश्वास ठेऊन आपल्या शेकडो समर्थकासह राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीत प्रवेश केला. आबासाहेब वरखडे व नानाभाऊ उगले यांच्या प्रमुख उपस्थितीत शफिक अत्तार यांच्यासह शेकडो कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीत प्रवेश केला. यावेळी माजी आरोग्य मंत्री राजेशभैय्या टोपे यांनी त्यांचे स्वागत केले. यावेळी पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## राजूरी गटातून आ.क्षीरसागरांना सर्वाधिक मताधिक्य देणार

### कॉर्नर सभेतून एकमुखाने लोकांचा निश्चय



**बीड । प्रतिनिधी**
राजुरी न. जिल्हा परिषद गटातून आ.संदीप क्षीरसागरांना सर्वाधिक मताधिक्य देण्याचा निर्धार राजुरी येथे झालेल्या कॉर्नर सभेतून उपस्थित नागरिकांकडून व्यक्त करण्यात आला.
सोमवार (दि.११) रोजी महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार संदीप क्षीरसागर यांच्या प्रचारार्थ राजुरी नवगण जिल्हा परिषद गटाची कॉर्नर सभा राजुरी येथील श्री मंगलमूर्ती देवस्थान परिसरात पार पडली. या सभेसाठी राजुरी नवगण जिल्हा परिषद गटातील सर्व गावातून नागरिक उपस्थित होते. यावेळी सर्व उपस्थितांनी एकमुखाने, आ.संदीप क्षीरसागर यांना आम्ही आमच्या गटातून सर्वाधिक मताधिक्य देणार असल्याचे एकमताने उपस्थितांनी सांगितले.

### धनंजय मुंडे यांचा योगायोग पुन्हा एकदा बाबासाहेब काळेंशी आला जुळून

## परळी कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी उपसभापती बाबासाहेब काळे यांचा शरदचंद्र पवार गटातून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश

**परळी वैजनाथ । प्रतिनिधी**
धनंजय मुंडे यांचा आणि परळी कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी उपसभापती तथा राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे नेते बाबासाहेब काळे यांचा पुन्हा एकदा योगायोग जुळून आला आहे. बाबासाहेब काळे यांनी शरद पवार गटाला सोडचिठ्ठी देत धनंजय मुंडे यांचे नेतृत्व स्वीकारून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला आहे. त्यामुळे सिरसाळा आणि परिसरात धनंजय मुंडे यांची ताकत आणखी वाढणार आहे.
बाबासाहेब काळे यांनी माजी आ.आर.टी. जिजा देशमुख, माजी आ.संजय भाऊ दौंड यांच्या प्रमुख उपस्थितीत काल राष्ट्रवादी



काँग्रेस पक्षात प्रवेश केला आहे. यावेळी धनंजय मुंडे यांनी देखील दूरध्वनीवरून श्री काळे यंच्याशी संवाद साधत त्यांचे स्वागत केले.
यावेळी माजी आ.आर.टी. जिजा देशमुख, माजी आ.संजय भाऊ दौंड, लक्ष्मण तात्या पौळ, राजाभाऊ पौळ, चंद्रकांत कराड, संपत महाराज पुरी, मोहनराव बडे, रवी बडे, रुस्तुम बप्पा सलगर, रमेशराव मुंडे यांसह आदी उपस्थित होते.

### पुरुषोत्तम वीर यांना आमदार करण्यासाठी बीडचा मुस्लिम सज्ज-अन्वर पाशा

## एम आय एम चे जिल्हा सचिव अन्वर पाशा यांचे सह असंख्या पदाधिकारी यांचा वंचित मध्ये प्रवेश

**बीड । प्रतिनिधी**
वंचित बहुजन आघाडीच्या जोशाबा समतापत्र जाहीरनामा हा सर्वांगीण विकासाचा जाहीरनामा असून मुस्लिम धर्मगुरू,प्रेषित,पैगंबर पवित्र धर्मग्रंथांचा कोणाकडूनही अवमान होणार नाही.याकरिता मोहम्मद पैगंबर बिल लागू करुन त्याद्वारे मुस्लिमांना संरक्षण देण्याची हमी त्यासोबतच मुस्लिमांच्या विविध प्रश्नांवर सातत्याने वंचित ने आवाज उठवला व धर्माच्या पलीकडे जाऊन समता प्रस्थापित करणाऱ्या वंचित बहुजन आघाडी सोबत बीड मधील मुस्लिम व दलित समाज उभा राहिला असून वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष मा. खा.एड. प्रकाश तथा बाळासाहेब आंबेडकर यांचे हात बळकट करण्यासाठी एम आय



एम या पक्षातील जिल्हा सचिव अनवर पाशा यांचे सह असंख्य कार्यकर्त्यांनी वंचित बहुजन आघाडीचे राज्य प्रवक्ता तय्यब जफर यांचे हस्ते वंचित बहुजन आघाडीमध्ये जाहीर प्रवेश करून बीडचे उमेदवार पुरुषोत्तम नारायणराव विर यांना मताधिक्याने निवडून आणण्यासाठी मुस्लिम समाज सज्ज असल्याचे अन्वर पाशा यांनी सांगितले.

# गंगापूर-खुलताबादचा सर्वांगीण विकास करायचा असेल तर यंदा परिवर्तन करा - खा. शरद पवार

**गंगापूर ।प्रा संजय तुपे**

गंगापूर खुलताबाद मतदारसंघात शेती, सिंचन, पर्यटन आदी प्रश्न प्राधान्याने मार्गी लावून मतदारसंघाचा सर्वांगीण विकास करायचा असेल तर येणाऱ्या निवडणुकीत परिवर्तन घडवा असे आवाहन खा. शरद पवार यांनी केले. गंगापूर-खुलताबाद विधानसभा मतदारसंघाचे महाविकास आघाडीचे राष्ट्रवादी काँग्रेस-शरदचंद्र पवार पक्षाचे अधिकृत उमेदवार सतीश भानुदासराव चव्हाण यांच्या प्रचारार्थ आज खा. शरद पवार यांची आज गंगापूर शहरात जाहीर सभा आयोजित करण्यात आली आहे. याप्रसंगी बोलताना शरद पवार म्हणाले की, भाजपाच्या राजवटीत शेतकऱ्यांचे प्रश्न गंभीर आहेत. शेतमालाला भाव नाही. कवडीमोल भावाने शेतमाल आज विकावा लागतो. त्यामुळे शेतकरी अडचणीत आहे. पाच वर्षांत शेतकरी आत्महत्या मोठ्या प्रमाणात वाढल्या. आम्ही ७१ हजार कोटीची कर्जमाफी केली. ही संवेदनशीलता मोदी सरकारकडे नाही. पाच महिन्यांत ९०० शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या मात्र सरकार त्याकडे लक्ष द्यायला तयार नाही, अशा भाजपच्या हातून सत्ता काढून घेतली पाहिजे. असे आवाहन शरद पवार यांनी जनतेला केले. गंगापूर-खुलताबाद मतदारसंघील एकही प्रश्न गेल्या पंधरा वर्षांपासून भाजपाचा आमदार सोडू शकला नाही. गोदावरी

जवळ असून शेतीसाठी व पिण्यासाठी या तालुक्यात पाणी आले नाही, खोटी आश्वासने दिली जातात व फसवणुकीचे उद्योग करुन लोकांची मते मिळवली जातात हे इथे वारंवार घडत आले आहे. अशा शब्दांत शरद पवार यांनी विद्यमान आमदार यांच्यावर टीकास्त्र सोडले. आता या तालुक्याचा विकास करायचा असेल तर तुम्हाला परिवर्तन करावे लागेल. सतीश चव्हाण यांच्या मागे या निवडणुकीत उभे राहावे लागेल, असे आवाहन त्यांनी उपस्थितांना केले. प्रारंभी उमेदवार आ.सतीश चव्हाण यांनी सभेत विजयी करण्याचे आवाहन करून विद्यमान आमदार यांना या तालुक्याचे प्रश्न सोडविण्यात आलेले अपयश यावर भाष्य केले. या मतदारसंघातील पाणी, सिंचन, शिक्षण, आरोग्य व अनेक सार्वजनिक प्रश्न जैसे थे आहेतच. उलट प्रश्न




विचारणाऱ्या तरुणांवर दडपशाही करीत आहे. ही दादागिरी संपुष्टात आणावी लागेल व तालुक्यात लोकांच्या हिताचे व विकासाचे राजकारण करावे लागेल यासाठी साथ द्या असे आवाहन त्यांनी केले. शिवसेना नेते चंद्रकांत खैरे यांनी महाविकास आघाडीतील नेत्यांनी एक दिलाने काम करुन हा व्यापारी माणूस घरी बसवला पाहिजे. उद्धव बाळासाहेब ठाकरे साहेबासोबत वाईट वागणाऱ्या भाजपला धडा शिकवावाच लागेल असे आवाहन केले. भूषणसिंह राजे होळकर यांनी देखील आमदार सतीश चव्हाण यांच्या मागे उभे राहण्याचे आवाहन केले. माजी मंत्री फौजिया खान, मा. खा. चंद्रकांत खैरे, भूषणसिंह राजे होळकर, किशोर पाटील, सुधाकर सोनवणे, डॉ. नरेंद्र काळे, मा. खा. शरदचंद्रजी पवार साहेब, जाहीर सभा आबेद जागीरदार, हाजी अकबर बेग, दिलीप बनकर संजय जाधव जगन्नाथ **मनसेचे जिल्हाप्रमुख दिलीप बनकर यांचा राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश**. दरम्यान याप्रसंगी मनसेचे जिल्हाध्यक्ष दिलीप बनकर, मारुती साळवे मुजीव समाज आदीनी आज शरद पवार यांच्या उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला खोसरे, पांडुरंग तांगडे, मोहसीन चाऊस, रावसाहेब तोगे, अंकुश काळवणे, विश्वजीत चव्हाण, लक्ष्मण सांगळे, सुवर्णा जाधव, अशोक गायकवाड, श्याम बनसोड, लक्ष्मण सांगळे, संपत छाजेड, दिनेश मुथा, आप्पासाहेब गावंडे, गजानन फुलारे, अनिल चव्हाण, अशोक गावंडे, रमेश निचित, नईम मन्सूरी, मच्छिंद्र देवकर, सुभाष वरकड, नासेर पटेल, आयुब पटेल, सुनील धाडगे, अनिता खोसरे आदीसह महाविकास आघाडीचे पदाधिकारी, कार्यकर्ते, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. खोसरे, राजू वरकड, किशोर कुकलारे, शोभा खोसरे छाया जंगले अप्पासाहेब

# बहुजन समाज पार्टीचे उमेदवार सुनील मारुती गायकवाड यांचा जोरात प्रचार सुरू

## उरणच्या समस्या सोडवण्यासाठी निवडून देण्याचे सुनील गायकवाड यांचे आवाहन




**उरण । विठ्ठल ममताबादे**

उरण विधानसभा मतदारसंघात चुरशीचा लढा पहावयास मिळत असून उरण विधानसभा मतदारसंघात एकूण १४ उमेदवार निवडणूक रिंगणात उभे आहेत. १४ उमेदवारांचाप्रचार सुरु आहे. उरण विधानसभा मतदारसंघात बहुजन समाज पार्टी तर्फे सुनील मारुती गायकवाड (चिन्ह हत्ती) हे निवडणूक लढवत असून बहुजन समाज पार्टीचे सुनील गायकवाड हे प्रामाणिक एकनिष्ठ कट्टर कार्यकर्ते असल्याने पक्षाचे तसेच विविध सामाजिक संस्था संघटनेचा त्यांना मोठ्या प्रमाणात पाठिंबा मिळत आहे.तळागाळात जाऊन गोरगरिबांना अनेकदा सुनील गायकवाड यांनी मोठ्या प्रमाणात मदत केली आहे.उरण मधील विविध समस्या, प्रश्न विरोधात अनेकदा संप आंदोलन त्यांनी केले आहेत. विविध समस्या सोडवण्यासाठी शासन दरबारी पत्रव्यवहार सुद्धा केला आहे. विविध समस्यांचा शासन दरबारी पाठपुरावा केला आहे. त्यामुळे जनतेचा सुनील गायकवाड यांच्या प्रचाराला उत्तम प्रतिसाद मिळाला आहे. उरण मध्ये शैक्षणिक समस्या आहेत, आरोग्य समस्या आहेत, विकासाचे अनेक कामे प्रलंबित आहेत त्या सोडवण्यासाठी मला बहुमताने निवडून द्या असे आवाहन बहुजन समाज पार्टीचे उरण विधानसभा मतदारसंघाचे अधिकृत उमेदवार सुनील मारुती गायकवाड यांनी जनतेला केले आहे.

## मोदी-शहांनी अवघा महाराष्ट्र लुटला

# मुलगी शिकली,प्रगती झाली आणि पंधराशे देऊन घरी बसवली,हा विकास आहे?-उद्धव ठाकरे

**नांदेड (वृत्तसंस्था)**

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी शनिवारी पुन्हा एकदा पंतप्रधान नरेंद्र मोदी व केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्यावर तिखट हल्ला चढवला. नरेंद्र मोदी व अमित शहा यांनी अवघा महाराष्ट्र लुटला. त्यानंतर आता ते महाराष्ट्रात मते मागण्यासाठी जागोजागी फिरत आहेत, असे ते म्हणालेत. मुलगी शिकली, प्रगती झाली आणि पंधराशे देऊन घरी बसवली, हा विकास आहे का? असा उपरोधिक टोलाही त्यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील महायुती सरकारवर निशाणा साधताना हाणला.

उद्धव ठाकरे यांची शनिवारी नांदेड जिल्ह्यातील लोहा - कंधार विधानसभा मतदारसंघात सभा झाली. या सभेत त्यांनी भाजप महायुतीवर विशेषतः पंतप्रधान नरेंद्र मोदी व केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्यावर तिखट टीका केली. ते म्हणाले, नरेंद्र मोदी व अमित शहांना आता महाराष्ट्राची आठवण झाली आहे. आतापर्यंत त्यांना महाराष्ट्र केवळ लुटण्यासाठी आहे असे वाटत होते. पण आता महाराष्ट्रातील लोकांना मतदानाचा अधिकार आहे हे त्यांच्या लक्षात आले आहे. त्यानुसार आता ते इथे येऊन मतांचा जोगवा मागत आहेत.या लोकांनी महाराष्ट्राचे सर्व उद्योग लुटून



गुजरातला नेता आणि आता निर्लज्जपणे महाराष्ट्राची मते मागता? तुम्हाला काय वाटते? तुम्ही काही केले तरी चालले आणि महाराष्ट्र केविलवाणेपणाने मत देईल? ही लढाई केवळ उद्धव ठाकरे व शिवसेनेची नाही. आपल्याला सत्ता पाहिजे. पण हे सर्व केवळ महाविकास आघाडीसाठी नाही तर येथील सर्वसामान्य जनतेसाठी आपल्याला सत्ता हवी आहे.

उद्धव ठाकरे म्हणाले, भाजपने आता बटेंगे तो कटेंगे असा नारा दिला आहे. कोण कापणारे आहेत? जे काही कापणारे आहेत ते तुमच्यासोबत सत्तेत बसलेले आहेत. त्यांनी माझ्या एका कार्यकर्त्याचे केवळ फेसबुक पोस्ट टाकली म्हणून बोटे कापली. ज्यांनी माझ्या कार्यकर्त्याची बोटे कापली, त्यांना आम्ही आता राजकारणात कापणार आहोत, असे उद्धव ठाकरे यावेळी माजी खासदार तथा अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार प्रताप पाटील चिखलीकर यांना इशारा देत म्हणाले. चिखलीकर यांच्यावर ठाकरे गटाच्या एका कार्यकर्त्याची बोटे छाटल्याचा आरोप आहे.मोदी येथे आले तर त्यांना हा माझा बोटे कापलेला कार्यकर्ता दाखवा. त्यांना विचारा कोण आहे हा? काय त्याचा गुन्हा? विरोधात पोस्ट टाकली म्हणून त्याचे बोटे छाटता? त्याने तर पोस्ट टाकली, मी तर तुमच्याविरोधात उघडपणे बोलत आहे, असे ते म्हणाले. उद्धव ठाकरे यांनी यावेळी बोटे छाटलेल्या पीडित कार्यकर्त्याला आपल्याजवळ बोलावले. तसेच त्याला त्याच्यावर बेतलेल्या प्रसंगाचा बदला मी स्वतः घेणार, असा धीरवजा शब्द त्याला दिला. यावेळी उपस्थितांनी मोठी घोषणाबाजी केली.उद्धव ठाकरे पुढे म्हणाले, आतापर्यंत भाजपवर मोदी व शहांची पोलादी पकड होती. पण आता त्यांची सर्वत्र छी - थू होत आहे. त्यांचे अनेक नेते आता या दोघांचे काहीही चालत नाही म्हणून भाजप सोडून जात आहेत. सर्वजण आमच्या हातातील मशालीच्या प्रकाशात येत आहेत. आमच्याकडे मशालीचा प्रकाश, तर भाजपमध्ये केवळ काळा अंधार पसरला आहे.

# बळीराजास भिकार्याची उपमा देता; बळीराजाच तुम्हाला तुमची योग्य जागा दाखविणार-डॉ.बाबासाहेब देशमुख

## शिरभावी येथे शेकापची कॉर्नरसभा संपन्न; संविधान देऊन देशमुख बंधूचे स्वागत

**सांगोला । प्रतिनिधी**

रात्रदिवस घाम गाळून, काबाडकष्ट कष्ट करुन बळीराजा जगाचा पोशिंदा बनला आहे. त्याच बळीराजाला भिकार्याची उपमा देता, लाज वाटली पाहिजे तालुक्यातील बोलणार्यांना. रात्रदिवस घाम गाळणार्या बळीराजाला भिकार्याची उपमा देता.त्यामुळे येणार्या काळात बळीराजाच तुम्हाला तुमची योग्य जागा दाखवेल असे सांगत स्व.आबासाहेबांनी ज्या बळीराजास केंद्रबिंदू ठेवून समाजकारण केले, तोच बळीराजा आमच्यासाठी सर्वकाही असून शेतकरी कामगार पक्ष बळीराजाचा अवमान कदापीही सहन करणार नसल्याचे डॉ.बाबासाहेब देशमुख यांनी दिली. सांगोला विधानसभा मतदार संघाचे महाविकास आघाडी-इंडिया अलायन्स पुरस्कृत शेतकरी कामगार पक्षाचे उमेदवार डॉ. बाबासाहेब आण्णासाहेब देशमुख यांच्या प्रचारार्थ शिरभावी, धायटी, चिंचोली येथे भव्य कॉर्नरसभा संपन्न झाली. यावेळी व्यासपीठावर डॉ.अनिकेत देशमुख, मा.सभापती बाळासाहेब काटकर, डॉ.सुदर्शन घेरडे, प्रदिप मिसाळ, दत्तात्रय चव्हाण यांच्यासह मित्रपक्षाचे व शेतकरी कामगार पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी डॉ.बाबासाहेब देशमुख म्हणाले की, सांगोला मतदारसंघात अनेक विषय जाणीवपूर्वक प्रलंबित ठेवण्यात आलेले आहेत. गेल्या ५ वर्षात सत्ता असूनही यांना पाणी तसेच रस्ते, शिक्षण आणि आरोग्याचा प्रश्न सोडवता आलेला नाही.सांगोला तालुक्याचा विकास करायचा आहे. म्हणून शेकापला मतदान करणे गरजेच आहे.सांगोला मतदार संघाचा सर्वांगीण विकास हेच माझे ध्येय असून हा मतदार संघ विकसीत करण्यासाठी आणि येथील समस्या सोडविण्यासाठी मी प्रयत्नशील आहे, अशी ग्वाही त्यांनी दिली.

यावेळी शिरभावी येथील मायाप्पा व्होवाळ यांनी संविधान वाचविण्यासाठी शेतकरी कामगार पक्षच गरजेचा आहे. स्व.आबासाहेबांनी पुरोगामी विचार टिकवून सर्वसामान्यांना न्याय दिला. शेतकरी कामगार पक्षाने पुरोगामी विचाराचे राजकारण करुन चळवळ जिंवत ठेवली.त्याच विचाराला व चळवळीला आम्ही आता साथ देणार असून डॉ.बाबासाहेब देशमुख यांना निवडून आणण्यासाठी रात्रीचा दिवस करणार असल्याचे सांगितले.

या कार्यक्रमाप्रसंगी शिरभावी येथील आनंद व्होवाळ यांनी त्यांच्या असंख्य कार्यकर्त्यानी शेतकरी कामगार पक्षात प्रवेश केला. सर्वांचे स्वागत डॉ.बाबासाहेब देशमुख व डॉ.अनिकेत देशमुख यांनी करुन सर्वांचा मान सन्मान राखला जाईल, आपला विश्वास तडा जाऊ दिला जाणार नाही असे सांगितले.



हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077